पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC/ADM/NOTIFICATION/ 8 /2022 DATE :- 28 /01/2022

## ''वाहतूक नियंत्रण अधिसूचना''

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यक्षेत्रात कासारवडवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. या कंपनी कडून मुंबई मेट्रो लाईन–४ चे कासारवडवली ते गायमुख पर्यत काम चालू आहे. सदर मेट्रो – ४ चे पिलरवर वेदांत हॉस्पीटल ते ओवळा सिग्नल घोडबंदर रोड, ठाणे या ठिकाणी गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी,** दि. २४/०१/२०२२ रोजी पिलर क्र. १८ ते १९ चे काम, दि. २५/०१/२०२२ रोजी पिलर क्र. १९ ते २० चे काम वेदांत हॉस्पीटल ते ओवळा सिग्नल, घोडबंदर रोड, ठाणे या ठिकाणी गर्डर टाकण्याचे काम रात्रौ २३:०० ते पहाटे ०५:०० वाजेपावेतो करण्यात येणार आहे. त्यावेळी ठाणे कडून घोडबंदर रोड वाहिनी वाहतुकीस बंद करण्यात येणार असल्याने, सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई–नाशिक महामार्गाने घोडबंदर रोडच्या दिशेने जाणा–या अवजड वाहनांना तत्वज्ञान विद्यापीठ, कापूरबावडी जंक्शन येथे ''**प्रवेश बंद**'' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) मुंबई–नाशिक महामार्गाने घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारी जड अवजड वाहने कापूरबावडी सर्कल येथून उजवे वळण घेवून बाळकुमनाका, भिवंडी आग्रारोड, कशेळी,काल्हेर, अंजुरफाटा, भिवंडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) तसेच इतर हलकी वाहने ही **पीलर क्रमांक** १८ ते १९ व १९ ते २० **वर गर्डर टाकणेचे वेळी** वेदांत हॉस्पीटल **येथुन डावीकडे वळण घेवुन सर्व्हिस रोड**ने ओवळा सिग्नल **येथे उजवीकडे वळण घेवुन घोडबंदर रोड मार्गे इच्छित स्थळी** जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबई कडून कापूरबावडी जंक्शन, तत्वज्ञान विद्यापीठ मार्गे घोडबंदर रोडकडे जाणाऱ्या सर्व जड, अवजड वाहनांना **माजीवाडा गोल्डन डाईज** ब्रिज वर वाय जंक्शन येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने ही नाशिक रोडने खारेगांव टोलनाका, मानकोली नाका, अंजुर फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना ही खालील नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होई पर्यत अंमलात राहील.

१) दि. २४/०१/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. २५/०१/२०२२ रोजी सकाळी ०५.०० वाजे पर्यंत
२) दि. २५/०१/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. २६/०१/२०२२ रोजी सकाळी ०५.०० वाजे पर्यंत

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

पोलीस उप आयुक्त,
अ.गु.शा. व सायबर सेल, ठाणे
आवक क्रमांक : 92/2022
दिनांक : 25/01/2022

(कृ.मा.पा.)